पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ११२ /२०२२ दि. ९/१२/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत हिराघाट रस्त्याकडून डर्बी चौक कडे येणाऱ्या गोशाळा जवळ सेक्शन १७, उल्हासनगर ३ या मार्गावर ७/३० लांबी रूंदीची नाली व साकव बांधण्याचे काम मारूती असोशिएटस्, उल्हासनगर या कंपनीमार्फत करण्यात येणार आहे. सदरचे काम जलद गतीने होण्यासाठी नमुद मार्गावरून जाणारी जड अवजड वाहने वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** पवई चौक, उल्हासनगर ३ रस्त्याकडून डर्बी चौक कडे जाणाऱ्या जड – अवजड वाहनांना **बोट क्लब** हिराघाट **उल्हासनगर ३** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** पवई चौक, उल्हासनगर ३ कडून हिराघाट कडे येणाऱ्या सर्व वाहनांना बोट क्लब, हिराघाट, उल्हासनगर ३ येथून डावीकडे वळण घेवून पंचशील नगर, काजल पेट्रोल पंप, स्मशानभूमी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ०२/१२/२०२२ रोजी ते दि. २५/१२/२०२२ रोजी पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी वाहतूक शाखा.

२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner